International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताची कामगिरी

**प्रा. डॉ. देवकते उत्तम शेषराव**

*शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणी सावरगाव ता.गंगाखेड जि.परभणी*

***Corresponding Author - प्रा. डॉ. देवकते उत्तम शेषराव***

**DOI - 10.5281/zenodo.10963485**

**प्रस्तावना:**

ख्रिश्चन रोमन बादशाह 'थिओडिसीज' ने इ. स. 394 साली प्राचीन ऑलिंम्पिक सामने बंद केले. निसर्गामुळे ऑलिम्पिक अवशेष भूगर्भात गडप झाले. अनेक वर्षे लोटून गेली. परंतु सत्य, सचोटी, सुचिता, चारित्र्य, विश्वबंधुत्व इत्यादी गुणांचेप्रतीक असलेले 'ऑलिंम्पिकतत्व' नष्ट होऊ शकले नाही. ग्रीक लोकांचा वत्यांच्या खेळाचा इतिहास जग विसरणे शक्य नव्हते. जीवनास पोषक असलेली मूलतत्त्वे चिरकालीन व अमर असतात याचा दाखला आधुनिक ऑलिंम्पिक स्पर्धांनी जगाला दाखवून दिला.

भारतातील 'मोहेंजोदारो व हडप्पा' येथील सींध नदीच्या खोऱ्यातील संस्कृती काळाच्या उदरात गडप झाली होती. त्याप्रमाणेच ग्रीस मधील 'ऑलिंम्पिया' येथील ऑलिंम्पिक स्पर्धेसाठी उभारलेले स्टेडियम भूकंपामुळेजमिनीखाली गाडले गेले होते. मधल्या काळात या प्राचीन ग्रीक क्रीडा परंपरेची आठवण ग्रीकांना किंवा जगालाही झाली नाही परंतु इ.स. 394 नंतर साधारणता: अकराशे पन्नास वर्षा नंतर इ.स.1723 मध्ये फ्रेंच इतिहास संशोधक 'बर्नार्ड माउंट फादूकोन' यांनी सर्वप्रथम या ग्रीक परंपरेचा शोध लावला. त्यानंतरही अनेकांनी प्रयत्न केले. यापैकी अनेकांचे प्रयत्न निष्फळ ठरले. तरीही अनेक इतिहास तज्ञांनी संशोधनाचे काम चालूच ठेवले. याकाळापर्यंत ग्रीक लोकांनाही आपल्या भूमीत आपल्या पायाखाली अशी वैभवशाली संस्कृती असल्याची फारशी जाणीव झाली नव्हती. उलटया ऑलिम्पिया येथील प्राचीन, घडवलेले कोरीव दगड घर बांधण्यासाठी वा अन्य कारणासाठी उपयोगात आणत. यानंतर मात्र ग्रीकांना हळूहळू त्याची जाणीव होऊ लागली.

**ऑलिम्पिकचे पुनरुज्जीवन:**

इ. स. 1881 मध्ये प्राचीन ऑलिंम्पिकचे जमिनीत गाडलेले वैभव जमिनीतून काढण्यात यश मिळविले, आणि तेथील भव्य स्टेडियम, देवदेवतांची मंदिरे व पुतळे यांचे मानवास दर्शन घडले. त्यामुळे सर्वत्र प्राचीन ऑलिंम्पिक स्पर्धेच्या पुनरुज्जीवनाची लाट पसरली. ग्रीकांनातर अत्यानंद

झाला. त्यानंतर प्राचीन ऑलिंम्पिक स्पर्धेला आजचे भव्य, दिव्य वैभव प्राप्त करून देण्यासाठी फ्रान्सच्या 'बॅरंन डि कुबर्टीन' यांनी अथक प्रयत्न केले. दि. 25 नोव्हेंबर 1892 रोजी पॅरिस येथे भरलेल्या 'फ्रेंच युनियन ऑफ ॲथलेटिक्स स्पोर्ट्स' या संघटनेच्या पाचव्या अधिवेशनात 'बॅरंन डी कुबर्टीन' यांनी ऑलिंम्पिकच्या पुनरुज्जीवनाविषयीची कल्पना मांडली. त्यानंतर अनेक देशात जाऊन व्याख्याने दिली. अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या व सन 1894 मध्ये आंतरराष्ट्रीय काँग्रेसचे आयोजन केले व त्याचवेळी आधुनिक ऑलिंम्पिक स्पर्धेची मूहर्तमेढ रोवली गेली व सन 1896 मध्ये ऑलिंम्पिक स्पर्धा घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यासाठी अनेकांनी आर्थिक मदत केली. दि. 6 एप्रिल 1896 रोजी दुपारी 'अथेन्स' येथील पुर्नरचित भव्य स्टेडियम मध्ये ग्रीसच्या राजाने 'मी आधुनिक ऑलिंम्पिकच्या पहिल्या स्पर्धेचे उद्घाटन करीत आहे. अशी घोषणा केली आणि सलग सुमारे पंधराशे वर्ष बंद पडलेल्या प्राचीन ऑलिंम्पिक स्पर्धांचे पुनरुज्जीवन झाले.

**ऑलिंम्पिक स्पर्धा व भारत:**

आधुनिक ऑलिम्पिक स्पर्धेची सुरुवात इ. स. 1896 पासून झाली.

- इ.स. 1900 (पॅरिस-फ्रान्स) या दुसऱ्या ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने प्रथम भाग घेतला भारतात असलेल्या 'नॉर्मनप्रितचार्ड' या एका ब्रिटिश सैनिकाने भारताचे प्रतिनिधित्व केले. त्याने 200 मी. धावण्याच्या व 110 मी. अडथळा शर्यतीत भाग घेतला. या काळात देशाऐवजी व्यक्तिगत स्वरूपातही स्पर्धेत भाग घेण्याची अनुमती होती त्याने 200 मी. धावण्याच्या स्पर्धेत व 110 मी. अडथळयाच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळून दोन रौप्य पदक मिळविले.
- इ.स. 1904, 1908, 1912 या तीन ऑलिंम्पिक स्पर्धेत भारतांने सहभागच घेतला नाही. इ. स. 1916 च्या स्पर्धा युद्धामुळे रद्द करण्यात आल्या.
- इ. स. 1920 च्या सातव्या (ॲन्टपर्व-बेल्जियम) ऑलिंम्पिक स्पर्धेत महाराष्ट्रातील दोन मल्ल व चार ॲथलिट चा संघ पाठविला परंतु खेळाडूंची निराशाजनक कामगिरी झाली.
- इ. स. 1924 च्या आठव्या (पॅरिस-फ्रान्स) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने आठ ॲथलेट खेळाडूंचा संघ पाठविला होता. परंतु एकही पदक मिळाले नाही. कामगिरी अत्यंत निराशाजनक होती.
- इ. स. 1928 च्या नवव्या (ॲमस्टरडॅम-हॉलंड) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने आठ ऍथलेट व हॉकीच्या संघ पाठवला होता या स्पर्धेत मात्र भारताला सांघिक खेळात पहिले एकमेव सुवर्ण पदक हॉकी या संघाने मिळवून दिले व भारताच्या आशा पल्लवीत केल्या.
- इ. स. 1932 च्या दहाव्या (लॉसएंजिल्स-यु.एस. ए.) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने तीन ऍथलेट व एक हॉकीचा संघ पाठविला आणि सलग दुसऱ्या ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने हॉकीमध्ये सुवर्ण पदक पटकाविले.

● इ. स. 1936 च्या अकराव्या (बर्लिन-प.जर्मनी) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने चार ॲथलिट व हॉकीचा संघ पाठविला होता या स्पर्धेत भारताने हॉकीमध्ये सलग तिसरे सुवर्णपदक मिळवून ऑलिंम्पिक स्पर्धेत हॅट्रिक केली.

● इ. स. 1940, 1944 दुसऱ्या महायुद्धामुळे स्पर्धा आयोजन झाले नाही.

● इ. स. 1948 च्या चौदाव्या (लंडन-इंग्लंड) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 79 खेळाडूंचा आत्तापर्यंतचा सर्वात मोठा संघ पाठविला होता. पण फक्त हॉकीमध्ये सलग चौथे सुवर्ण पदक भारताने मिळविले.

● इ. स. 1952 च्या पंधराव्या (हेलसिंकी-फिनलंड) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 60 पुरुष आणि 4 महिलांचा समावेश असलेला संघ पाठविला होता. या स्पर्धेत भारताने स्वातंत्र्य प्रजासत्ताक म्हणून प्रथमच भाग घेतला होता. पुरुष हॉकी संघाने सलग पाचवे सुवर्ण पदक पटकावले तसेच पुरुषांच्याफ्रीस्टाईल कुस्तीमध्ये महाराष्ट्राच्या खाशाबा जाधवयांनी उल्लेखनीय कामगिरी करत नॉर्मनप्रितचर्डच्या 1900 च्या ऑलिम्पिक मधील पदक विजयानंतर भारताला पहिले वैयक्तिक कांस्य पदक मिळवून दिले.

● इ. स. 1956 च्या सोळाव्या (मेलबोर्न-ऑस्ट्रेलिया) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 58 पुरुष व एक महिलेचा समावेश असलेला 59 खेळाडूंचा संघ पाठविला होता या स्पर्धेत इतर खेळाडूंची कामगिरी निराशाजनक राहिली परंतु हॉकी संघाने मात्र सलग सहावे सुवर्णपदक मिळवून भारताचा नाव लौकिक वाढवला.

● इ. स. 1960 च्या सतराव्या (रोम-इटली) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 45 पुरुष खेळाडूंचा सहभाग असलेला संघ पाठविला होता. या स्पर्धेत पवनपुत्रमिल्खासिंगने अथलेटिक्समध्ये पुरुषांच्या 400 मी. धावणे मध्ये चौथ्या स्थानावर राहून कास्य पदक गमावले. मात्र हॉकी संघाने रौप्य पदकावर समाधान मानले.

● इ. स. 1964 च्या आठराव्या (टोकियो-जपान) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 52 पुरुष व एक महिला एकुण 53 खेळाडूंच्या संघ पाठवला होता. स्पर्धेत इतर खेळाडूंनी निराशाजनक कामगिरी केली परंतु परत एकदा हॉकी संघाने भारताला सुवर्ण पदक मिळवून दिले.

● इ. स. 1968 च्या एकोणिसाव्या (मेक्सिको) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 25 पुरुष स्पर्धकांचा संघ पाठविला यास्पर्धेत भारताला हॉकीमध्ये कांस्यपदकावर समाधान मानावे लागले इतर खेळाडूंनी निराशा केली.

● इ. स. 1972 च्या विसाव्या (म्यूनिक-जर्मनी) ऑलिंपिक स्पर्धेत भारताने 40 पुरुष एक महिला अशा 41 स्पर्धकांचा संघ पाठविला होता. परंतु या ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला एकही पदक मिळाले नाही.

● इ. स. 1976 च्या एकविसाव्या (मॉटियल-कॅनडा) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने 26 खेळाडूंच्या सहभाग असलेला संघ पाठविला परंतु यास्पर्धेतही

भारताला एकही खेळात पदक मिळाले नाही. हॉकी संघानेही यावेळी नीराशा केली.

● इ. स. 1980 च्या बाविसाव्या (मास्को-रशिया) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 58 पुरुष व 18 महिला मिळून 76 खेळाडूंचा संघ पाठवला होता. या स्पर्धेत परत एकदा हॉकी संघाने सुवर्णपदक पटकावून भारताच्या आशा पल्लवीत केल्या. मात्र पि. टी. उषाचे 400 मी. अडथळा शर्यतीतील कस्यपदक अवघ्या एकशतांश सेकंदाने हुकले. (कांस्य पदक विजेता खेळाडू -55.41सेंकद तर पी.टी.उषाला-55.42 सेकंद)

● इ. स. 1984 च्या तेविसाव्या (लॉसएंजेलस-अमेरिका) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 48 खेळाडूंचा संघ पाठवला होता. परंतु एकही पदक मिळाली नाही.

● इ. स. 1988 च्या चोविसाव्या (सोल-द.कोरिया) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने 39 पुरुष व 07 महिला आशे 46 खेळाडूंचा संघ पाठवला होता. पण भारताला एकही पदक जिंकता आले नाही.

● इ. स. 1992 च्या पंचविसाव्या (बार्सिलोना-स्पेन) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 52 खेळाडूंच्या संघ पाठवला होता. परंतु भारताला एकही पदक मिळविता आले नाही.

● इ. स. 1996 च्या सहविसाव्या (अटलांटा-अमेरिका) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने 49 खेळाडूंचा संघ पाठवला होता. या स्पर्धेत पुरुष टेनिस स्पर्धेत लिएंडर पेसचे कांस्य पदक हे देशाला मिळालेले एकमेव पदक होते. भारताला ऑलिम्पिक स्पर्धेत वैयक्तिक पदक जिंकून 44 वर्षे वाट पाहावी लागली होती. 1952 मध्ये कुस्ती स्पर्धेत खाशाबा जाधवने कास्य पदक पटकावले होते. 1980 च्या मास्को ऑलिंपिकमध्ये पुरुष हॉकी संघाने सुवर्ण पदक जिंकल्यानंतर सोळा वर्षानंतर भारताला कुस्तीमध्ये कांस्यपदक मिळाले.

● इ. स. 2000 सताविसाव्या (सिडनी-ऑस्ट्रेलिया) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने संघ पाठविला या ऑलिम्पिक स्पर्धेत पहिल्यांदाच एका महिलेने कर्णम मल्लेश्वरीने वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारात प्रथमच कांस्यपदक जिंकून इतिहास रचला.

● 2004 च्या अठ्ठावीसव्या (अथेन्स-ग्रीस) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने पुरुष 48 व महिला 25 असे एकूण 73 खेळाडूंचा संघ पाठविला होता. परंतु एकमेव पदक नेमबाजीमध्ये राज्यवर्धन सिंग राठोड यांनी रौप्य पदक पटकावले. वैयक्तिक रौप्यपदक जिंकणारा तो पहिला भारतीय ठरला.

● 2008 च्या एकोणतीसाव्या (बीजिंग-चीन) ऑलिंम्पिक स्पर्धेत भारताने एकूण 56 खेळाडूंचा संघ पाठविला. या स्पर्धेत मात्र भारताला नेमबाजीत अभिनव बिंद्राने वैयक्तिक स्वरूपात आत्तापर्यंतचे पहिले सुवर्ण पदक जिंकूण इतिहास रचला, कुस्तीमध्ये सुशील कुमारने कास्यपदक बॉक्सिंगमध्ये विजेंदर सिंगने सुद्धा कास्यपदक जिंकले. या स्पर्धेत पहिल्यांदाच एकूण तीन पदके भारतीय खेळाडूंनी जिंकली होती.

● 2012 च्या तिसाव्या (लंडन-इंग्लंड) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने आत्तापर्यंतचा सर्वात मोठा असा 83 खेळाडूंचा संघ ऑलिम्पिकसाठी पाठविला. या स्पर्धेत नेमबाजीत विजय कुमारने

रौप्यपदक, गगन नारंगणे कास्य पदक तर कुस्तीमध्ये सुशील कुमारने रौप्य पदक, योगेश्वर दत्तने कांस्य पदक जिंकले. बॅडमिंटनमध्ये सायना नेहवालने कास्य पदक पटकावले तर बॉक्सिंगमध्ये मेरी कोमने सुद्धा कास्यपदक जिंकले. भारताने यावेळेस सहा पदक मिळवून ऑलिंम्पिक स्पर्धेत इतिहास रचला.

- 2016 च्या एकतीसाव्या (रियोदिजानेरो-ब्राझील) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने एकूण 117 खेळाडूंचा संघ पाठविला होता. खेळाडूंची संख्याही आजपर्यंतची सर्वात जास्त होती. परंतु यास्पर्धेत बॅडमिंटनमध्ये पी. व्ही. सिंधूने रौप्यपदक व साक्षी मलिकने कुस्तीमध्ये कांस्यपदक जिंकून इतिहास रचला कारण कुस्तीतील आजपर्यंतचे भारतीय महिला खेळाडूने मिळविलेले ऑलिंम्पिक स्पर्धेतील एकमेव पदक होते. इतर खेळाडूंनी मात्र निराशा केली.

- इ. स. 2020 च्या बत्तीसाव्या (टोकियो-जपान) ऑलिम्पिक स्पर्धेत भारताने 122 खेळाडूंचा संघ पाठविला होता. या स्पर्धेत मात्र भारताने एकूण सात पदक जिंकून इतिहास रचला भाला फेकमध्ये नीरज चोप्राने सुवर्ण पदक जिंकले, भारतोलनमध्ये मीराबाई चानुने रौप्यपदक जिंकले, कुस्तीमध्ये रवीकुमार दाहियाने रौप्यपदक तर बजरंग पुनियाने कास्यपदक जिंकले. पी. व्ही. सिंधूने बॅडमिंटनमध्ये कांस्य पदक पटकावले, मुष्टियुद्धमध्ये लव्हलिना बोर्गोहैनने कास्य पदक पटकावले तर हॉकीमध्ये पुरुषांच्या संघाने 40 वर्षांनी पहिल्यांदा कास्यपदक जिंकून हॉकीच्या सुवर्ण काळाची आठवण करून दिली. इ. स. 2020 पर्यंतच्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारताला एकूण फक्त 34 पदक मिळाले आहेत. आजपर्यंतची भारताची ऑलिम्पिक स्पर्धेतील कामगिरी अत्यंत निराशाजनक आहे. यापुढे तरी भारताची ऑलिंम्पिक स्पर्धेतील कामगिरी कशी उंचवता येईल याचे अवलोकन शासनाबरोबरच समाज, क्रीडातज्ञ, खेळाडू , पालक यांनी करणे गरजेचे आहे.

2024 च्या ऑलम्पिक स्पर्धा फ्रान्समधील पॅरिसमध्ये 26 जुलै ते 11 ऑगस्ट 2024 याकालावधीत होणार आहेत.

**निष्कर्ष:**

आधुनिक ऑलिम्पिक स्पर्धेची सुरुवात 6 एप्रिल 1896 ला ज्याठिकाणी प्राचीन ऑलिम्पिकची ज्योत विझली होती. त्याच ठिकाणी म्हणजे अथेन्स (ग्रीस) याठिकाणी आधुनिक ऑलिंपिक ज्योत प्रज्वलित करून यास्पर्धेची सुरुवात केली. आजपर्यंतची ऑलिंम्पिक स्पर्धेतील भारताची कामगिरी पाहता फारच निराशाजनक आहे. इ. स. 2020 पर्यंत जर आपण पाहिले तर एकूण स्पर्धा बत्तीस झाल्या आहेत. बत्तीस पैकी भारताने 28 स्पर्धेत सहभाग नोंदविलाआहे. इ. स. 2020 पर्यंत भारताला एकूण 34 पदक मिळाले आहेत. भारताची लोकसंख्या पाहता भारत जगात दुसऱ्या स्थानावर आहे. तो पहिल्या स्थानावर लोकसंख्येच्या बाबतीमध्ये जाऊ पाहतोय पण आपण खेळाच्या स्पर्धेत मात्र जगात खूपच खालच्या क्रमांकावर आहोत. भारतात पालकांचा, विद्यार्थ्यांचा व समाजाचा खेळाकडे पाहण्याचा

दृष्टिकोन निराशाजनक आहे. आज प्रत्येक पालकाला आपला पाल्य डॉक्टर, इंजिनियर व अधिकारी व्हावा अशी अपेक्षा असते. आणि ती का असू नये कारण भारतात खेळासाठी असणाऱ्या सुविधा, मैदाने, क्रीडा साहित्य, तज्ञ क्रीडा मार्गदर्शक इत्यादी गोष्टींचा अभाव आणि शासनाचा खेळाकडे पाहण्याचा उदासीनपणा इत्यादी अनेक कारणामुळे आज ऑलिंम्पिक स्पर्धेत पदक तालिकेच्या यादीत खूपच खालच्या नंबरला भारत येतो.

**संदर्भ:**

1.शारीरिक शिक्षणाचा इतिहास भाग- एक, प्रा श्रीपाल आ. जर्दे.

2. सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र - डॉ. प्रदीप आगलावे.

3. शोध निबंधाची लेखन पद्धती- मालशे स. ग.

4. शारीरिक शिक्षणाचा इतिहास भाग - दोन, प्रा. श्रीपाल आ. जर्दे.

5. इंटरनेट